3 1 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# ....तरच देशाची परिस्थिती बदलेल

## एस. इंद्रकांत : विद्यापीठातील वाणिज्य विभागाची परिषद

कोल्हापूर : देशातील मनुष्यबळाचा योग्य तो वापर करुन घेतल्यास देशाची परिस्थिती निश्चितपणे बदलेल, असे प्रतिपादन हैदराबाद येथील रिझर्व्ह बँक अध्यासनाचे प्रमुख प्रा. एस. इंद्रकांत यांनी सोमवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विभागामार्फत आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरु डॉ. डी. आर. मोरे होते. 'बदलातून विकास : समावेशक वृद्धीसाठी वाव' असा या परिषदेचा विषय आहे. प्रा. एस. इंद्रकांत म्हणाले, राष्ट्राचा आर्थिक विकास शाश्वत होण्यासाठी त्यामध्ये सर्वसमावेशकता असली पाहिजे. जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये आपण नक्की कोणत्या प्रकारचा विकास साधत आहोत याचा विचार करणे आवश्यक आहे.

शाश्वत विकास हाच सर्वसमावेशक विकास घडवून आणू शकतो. प्रभारी कुलगुरु डॉ. मोरे म्हणाले, संख्यात्मक विकासाबरोबरच कौशल्यपूर्ण व सातत्यपूर्ण विकास ही काळाची गरज आहे. महिला व वंचित समाजाला मुख्य प्रवाहात आणल्यास भारत लवकरच विकसित देश होऊ शकेल. कार्यक्रमास डॉ. व्ही. एस. पाटील, डी. एस. गुरव, डॉ. बोन्हाडे यांच्यासह इराण, इराक व लिबीयामधील सात प्रतिनिधींसह एकूण सुमारे शंभर प्रतिनिधी उपस्थित होते.

परिषदेचे समन्वयक प्रा. एस. एस. महाजन यांनी परिषदेच्या आयोजनाचा उद्देश सांगितला. विभागप्रमुख प्रा. ए. एम. गुरव यांनी स्वागत केले. डॉ. केदार मारुलकर यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)



शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन विभागातर्फे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन रिझर्व्ह बँक अध्यासनाचे प्रमुख प्रा. एस. इंद्रकांत यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून झाले. यावेळी डावीकडून प्रभारी कुलगुरु डॉ. डी. आर. मोरे, डॉ. ए. एम. गुरव, एस. एस. महाजन, केदार मारुलकर उपस्थित होते.

### विविध विषयांवरील शोधनिबंध

- परिषदेतील दुपारच्या सत्रामध्ये विविध प्रतिनिधींनी शोधनिबंधाचे सादरीकरण केले.
- त्यात औद्योगिक विकास व कॉर्पोरेट क्षेत्र, सरकारच्या योजना, सर्व समावेशक विकास, सामाजिक विकास व सबलीकरण आदी विषय होते.
- सात प्रतिनिधींसह एकूण सुमारे शंभर प्रतिनिधी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 JAN 2017

लोकमत

# प्रल्हाद माने यांची संसदीय कार्य मंत्रालयातर्फे निवड



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील डॉ. प्रल्हाद माने यांची भारत सरकारच्या संसदीय कार्य मंत्रालयातर्फे १४ व्या राष्ट्रीय युवक संसद स्पर्धेचे विद्यापीठाचे समन्वयक म्हणून निवड झाली आहे.

संसदीय कार्य मंत्रालयातर्फे विद्यापीठे आणि महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये संसदीय लोकशाही आणि संसदेच्या कामकाजाविषयी जागृती निर्माण होण्यासाठी संबंधित स्पर्धा घेतली जाते.

या स्पर्धेसाठी नियुक्त देशभरातील विद्यापीठनिहाय समन्वयकांचे उद्‌बोधन शिबिर नुकतेच पांडिचेरी येथे पार पडले. यामध्ये डॉ. माने सहभागी झाले होते. छत्तीसगड राज्यातील दोन आणि कर्नाटक राज्यातील दोन विद्यापीठांच्या १४व्या राष्ट्रीय युवक संसदेचे मूल्यमापन प्रक्रियेचे काम डॉ. माने यांच्याकडे सोपविले आहे.

यासंबंधाने संसदीय कार्य मंत्रालयाने ४ फेब्रुवारी रोजी देशभरातील एकूण १५ संघ समन्वयकांची बैठक संसदीय कार्य मंत्रालयाच्या सचिवांसमवेत सोनीपत (हरियाणा) येथील दिनबंधू छोटूराम विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्यापीठ येथे होणार आहे. डॉ. माने यांना प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांचे यामार्गदर्शन लाभले. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 1 JAN 2017
पुण्यनगरी

# विद्यापीठात विधी अधिविभागातर्फे राष्ट्रीय परिषद उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातील विधी अधिविभागामार्फत 'भारतातील पर्यायी तंटामुक्ती निवारण, अडचणी आणि दृष्टिकोन' या विषयावर राष्ट्रीय परिषद नीलांबरी सभागृहात पार पडली. यावेळी महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरणचे सचिव उमेशचंद्र मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

यावेळी मोरे म्हणाले, विधी सेवा पर्यायी तंटा निवारण यंत्रणा या पारंपरिक न्यायदानात एक पक्ष जिंकतो व दुसरा पक्ष हारतो. याचा परिणाम त्यांचा मानवी नात्यांवर होतो; मात्र पर्यायी वाद निवारण प्रक्रियेमध्ये दोन्ही पक्षांच्या नातेसंबंधावर भर दिला जातो.

डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, विधी अधिविभाग हा नेहमी सामाजिक भान जागृत ठेवून विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत असतो. प्रारंभी प्राजक्ता शेलार या विद्यार्थिनीने भरतनाट्यम् सादर केले. प्रास्ताविक व्ही. वाय. धुपदाळे यांनी केले. यावेळी समाजसेविका अर्चना पांढरे यांचा सत्कार करण्यात आला.

द्वितीय सत्रामध्ये विधी अधिविभागाचे विद्यार्थी अॅड. अभिजित शितोळे व सहकाऱ्यांनी प्रात्यक्षिक सादर केले. तसेच प्राचार्य राजशेखर मलुष्टे यांनी पर्यायी तंटा निवारण यंत्रणेची मांडणी सांगितली. सूत्रसंचालन संतोष शेलार यांनी केले. माधवी सरवदे यांनी आभार मानले. यावेळी जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. प्रकाश मोरे, समन्वयक कविता यादव, वकील, प्राचार्य आदी उपस्थित होते.